# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**मुंबईत अनेक मोकळ्या भूखंडावर मैदाने आणि उद्यानांच्या आरक्षणामुळे झोपड्यांच्या पुनर्विकास योजना राबवितांना येत असलेल्या अडचणी**

**(१) १८२३ (३०-०१-२०१५). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत अनेक मोकळ्या भूखंडावर झोपड्यांचे अतिक्रमण झाले असुन या अतिक्रमित भुखंडावर असलेल्या मैदान आणि उद्यानांच्या आरक्षणामुळे झोपड्यांची पुनर्विकास योजना राबवितांना अनेक अडचणी येत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासन त्वरीत आवश्यक ती कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१९-०९-२०१६) :**(१) मा. मुंबई उच्च न्यायालयाकडील रिट याचिका क्र.११५२/२००२ मधील दिनांक ३१.७.२००२ रोजी दिलेल्या अंतरिम आदेशानुसार बगीचा, उद्याने, क्रिडांगणे तसेच ना विकास क्षेत्रामध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजना, मा.उच्च न्यायालयाची परवानगी घेतलेशिवाय मंजूर करणेत येवू नये असे अंतरिम आदेश आहेत. बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, १९९१ च्या विनिमय ११(४) मधील तरतुदीनुसार आरक्षण/निर्देशना खालील क्षेत्र कमी न करता अशा आरक्षण/निर्देशनांचे स्थानांतर त्याच भूखंडामध्ये अथवा लगतच्या भूखंडामध्ये हितसंबंधीय व्यक्तींच्या संमतीने अनुज्ञेय आहे. सबब विनिमय ११(४) प्रस्तावाचे संदर्भात वरील अंतरिम आदेश लागू रहाणार नसल्याचे मा.उच्च न्यायालयाने दिनांक २५.७.२०१४ व दिनांक ४.९.२०१४ रोजीच्या निकालामध्ये स्प्ष्ट करून काही अंशी दिलासा दिलेला आहे.

(२) व (३) शासनाने खुल्या क्षेत्रावर राबविणेत यावयाच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसंदर्भात प्रारूप धोरण निश्चित करण्यासाठी दिनांक ८.१.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठीत केलेली आहे. सदर समितीकडून प्रारूप धोरण निश्चित झालेनंतर मा.उच्च न्यायालयास अवगत करून त्याबाबत पुढील कार्यवाही संकल्पित रहाणार आहे.

---

**राज्यातील बेकायदा धार्मिक स्थळांवर कारवाई करण्याबाबत**

**(२) १०९३५ (०७-०४-२०१६). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने दिनांक ५ मे, २०११ रोजी शासन निर्णय काढून बेकायदा धार्मिक स्थळांवर कारवाई करण्याचा निर्णय घेतला असून सदरहू निर्णयानुसार दिनांक २९ सप्टेंबर, २००९ नंतर उभारण्यात आलेल्या धार्मिक स्थळांवर ही कारवाई केली जाणार होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाची अंमलबजावणी शासनाने तसेच स्थानिक राज्य संस्थाकडून झालीच नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बेकायदा धार्मिक स्थळांबाबत ‘सोसायटी ऑफ फास्ट जस्टिस’ ही संस्था तसेच भगवानजी खाजगी याच्यातर्फे दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेवरील सुनावणीनंतर मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अभय ओक आणि न्यायमूर्ती अनिल मेनन यांच्या खंडपिठाने, शासनाने घेतलेल्या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करुन बेकायदा धार्मिक स्थळांवर कारवाई करण्याचे आदेश मुंबई महापालिकेला तसेच कारवाई करणाऱ्या पालिका कर्मचाऱ्यांना आवश्यक पोलीस संरक्षण देण्याबाबत दिनांक ९ जानेवारी, २०१५ रोजी दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, खंडपीठाने आदेशानुसार आजमितीस एकूण बेकायदा धार्मिक स्थळापैकी किती बेकायदेशीर धार्मिक स्थळांवर कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-१०-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर आदेश मा.न्यायालयाने दिनांक १८.०२.२०१६ च्या आदेशान्वये दिले आहेत.

(४) दिनांक ३१.०७.२०१६ पर्यंत महानगरपालिका क्षेत्रातील दिनांक २९.०९.२००९ पूर्वीच्या अनधिकृत धार्मिक स्थळांपैकी २०१६ अनधिकृत धार्मिक स्थळे नियमित करण्यात आली, ११४ अनधिकृत धार्मिक स्थळे निष्कासित करण्यात आली व १७ अनधिकृत धार्मिक स्थळे स्थलांतरित करण्यात आली. तसेच दिनांक ३१.०७.२०१६ पर्यंत जिल्हाधिकारी क्षेत्रातील दिनांक २९.०९.२००९ पूर्वीच्या अनधिकृत धार्मिक स्थळांपैकी ३२८११ अनधिकृत धार्मिक स्थळे नियमित करण्यात आली, ४९९ अनधिकृत धार्मिक स्थळे निष्कासित करण्यात आली व ६६ अनधिकृत धार्मिक स्थळे स्थलांतरित करण्यात आली. दिनांक २९.०९.२००९ नंतर उभारण्यात आलेल्या

अनधिकृत धार्मिक स्थळांपैकी दिनांक ३१.०७.२०१६ पर्यंत महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत धार्मिक स्थळांपैकी २०८ व जिल्हाधिकारी क्षेत्रातील १५५ अनधिकृत धार्मिक स्थळे निष्कासित करण्यात आली.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर व अमरावती विभागात न्याययहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळांमध्ये दोन हजारांवर प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत**

**(३) १३५३७ (०७-०४-२०१५). श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर व अमरावती विभागात न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळांमध्ये पोलीसांना विविध स्वरुपांच्या गुन्ह्यांची नमुने वैज्ञानिक तपासणीसाठी पाठवावी लागतात, त्या नमुन्याच्या अहवालाची गरज असते अहवालानुसार गुन्ह्यांचे स्वरूप ठरते आणि न्यायदानामध्ये अहवालाची भुमिका महत्वाची असते असे असतानाही जिल्हा निहाय दोन हजारावर प्रकरणे प्रलंबित आहे, त्यामुळे न्यायदान प्रक्रियेमध्ये आरोपी निर्दोष सुटतो, हे खरे आहे काय,

(२) विभागात विविध गंभीर गुन्ह्यामध्ये पोलीस पुराव्याची भौतिक तपासनी व्हसेरा, दारूगोळा तपासणी, जीवशास्त्र संबंधित तसेच डीएनए तपासणीसाठी नमुने पाठविली जातात परंतु अहवाल उशिरा प्राप्त होतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तळागाळातील शोषीत, अन्याय ग्रस्त निरापराध नागरीकांना न्याय तातडीने मिळण्याचे हेतूने शासनाने सदर प्रकरणी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-०८-२०१६) :** (१), (२) व (३) राज्यातील नागपूर व अमरावती येथील विभागीय न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळांकडे माहे मे, २०१६ पर्यंत विविध प्रकारची अनुक्रमे एकूण ८०६६ आणि ६२४ प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यानुषंगाने प्रयोगशाळांकडील प्रकरणे विचारात घेऊन शासनाने पदनिर्मिती करण्याची कार्यवाही चालू केली असून त्यातीलच एक भाग म्हणून राज्यातील सर्व प्रयोगशाळांतील सर्व विभागांकरिता एकूण १४७ पदे करार पध्दतीने भरण्यास शासनाने दिनांक २३/३/२०१६ च्या आदेशान्वये मानयता दिलेली आहे. तसेच, दिनांक २०/६/२०१६ रोजी मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली उच्च स्तरीय समितीने या प्रयोगशाळांमधील विविध विभागांकरिता नियमित सवरुपात ३१२ पदे व बाहय यंत्रणेकडून १०६ पदे अशी एकूण ४१८ पदे भरण्यास मान्यता दिलेली आहे. शिवाय, संगणक गुन्हे, टेप ऑथेटीकेशन इ. विभागांमध्ये १६४ पदे एक वर्षाच्या कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने भरण्यासही मान्यता देण्यात आलेली आहे. त्यामुळे नागपुर व अमरावतीसह राज्यातील सर्व न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळांमधील प्रलंबित प्रकरणे लवकरात लवकर निकाली लागण्यास मदत होणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील जोगेश्वरी येथे बोगस नोटांची छपाई करणाऱ्या दोंघाना अटक केल्याबाबत**

**(४) १७९८७ (१०-०८-२०१५). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जोगेश्वरी येथे बोगस नोटांची छपाई करणाऱ्या दोंघाना माहे एप्रिल, २०१५ च्या चौथ्या आठवडयात वा त्या सुमारास जोगेश्वरी विशेष पथकाने अटक केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, व त्या अनुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंनबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी चौकशी करण्यात येऊन दोन आरोपींना अटक करण्यात आली असून त्या आरोपींविरूध्द जोगेश्वरी पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.१०३/१५ भा.द.वि. कलम ४८९ (अ) (ब) (क) (ड), ३४, १२० (ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. तसेच याबाबत मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात येऊन सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंधुदुर्ग जिल्हयातील पोलीस वसाहतींच्या दुरावस्थेबाबत**

**(५) १९५१७ (१०-०८-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हयातील पोलिस वसाहतीच्या दुरावस्थेबाबत पोलिस कर्मचा-यांनी जिल्हा पोलिस अधिक्षकांकडे वारंवार लेखी तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलिस वसाहतीमधीत घरांच्या दुरुस्तीबाबत काणेती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१६) :**(१), (२) व (३) हे खरे नाही, तथापि सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत वेळोवेळी निवासस्थानांची आवश्यक दुरुस्ती केली जाते.

---

## पालघर जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग क्र.८ वरील हॉटेल व्यावसायिकांना हॉटेल्स २ वाजेपर्यंत चालू ठेवण्याच्या परवानगीबाबत

**(६) २५७९५ (०७-०८-२०१५). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग क्र.८ वर अच्छाड ते घोडबंद हॉटेल व्यावसायिकांना परवाना रात्री ११ वाजेपर्यंत चालू ठेवण्याची परवानगी असल्याने वाहन चालक, पर्यटकांना व उद्योजकांना उपासमारीची वेळ होत असते अशा वेळी रा.मा.क्र. ८ लगत हॉटेल व्यावसायिकांना २ वाजेपर्यंत चालू ठेवण्याची परवानगी मिळावी असे दिनांक १९ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बाबीला गुजरात राज्यात रात्री २ वाजेपर्यंत व मुंबई - पुणे एक्सप्रेस हायवे फुडमॉल दिवस- रात्र चालू ठेवण्यात येेतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय तसेच चौकशीत काय आढळून आले,

(४) तसेच राष्ट्रीय महामार्ग क्र.८ वर अच्छाड ते घोडबंदर येथे हॉटेल रात्री ११ वाजेपर्यंत बंद ठेवण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०८-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) अंशतः खरे आहे.

मुंबई पुणे एक्सप्रेस हायवेवर एका फुडमॉलला महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून २० तास चालू ठेवण्याबाबत परवानगी देण्यात आली असून सदर फुडमॉल २० तास सुरु व ४ तास बंद असतो. तसेच शासन परिपत्रक दिनांक ३/१२/२०११ अन्वये संबंधित कार्यालयाने अन्य फुडमॉल व हॉटेलला रात्री ११.०० वाजेपर्यंत चालू ठेवण्याबाबत परवानगी दिलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) ठाणे ग्रामीण जिल्हयातील काशिमीरा पोलीस ठाण्याच्या हदीतून जाणा-या राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ लगतची हॉटेल ही शासन परिपत्रक दिनांक ३/१२/२०११ अन्वये त्यांच्याकडे असलेल्या परवान्यांनुसार रात्री १.३० वाजपेर्यंत सुरु असतात.

---

## किसान कॉल सेंटर मध्ये नोकरीचे आमिष दाखवून लाखो रुपयांचा ऑनलाईन फसवणूक करण्यात आल्याबाबत

**(७) २७४११ (१२-०८-२०१६). श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)राज्यातील ग्रामीण भागातील बेरोजगारांना किसान कॉल सेंटर मध्ये नोकरीचे आमिष दाखवून लाखो रुपयांची ऑनलाईन फसवणूक करण्यात आल्याची बाब अचलपूर तालुक्यातील एका युवकाच्या तक्रारीनंतर माहे एप्रिल, २०१५ दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच पोलिस निरीक्षक, परतवाडा (जि.अमरावती) यांच्याकडे या संदर्भातील तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी आढळणाऱ्या व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस स्टेशन, नागपुरी गेट जि. अमरावती येथे गु. र. नं. ८१/२०१५ कलम ४२० भादंवि अन्वये गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. सदर प्रकरणात चौकशी करण्यात आली असता गुन्हयातील आरोपीतांनी दिलेले मोबाईल क्रमांक हे मयत इसमाचे तसेच बँक खाते हे बरेच दिवसापासून बंद असल्याचे निष्पन्न झालेले आहे. सदर प्रकरणातील आरोपी हे बंद बँक खात्याचा किंवा मयत ईसमाचे नावे असलेल्या मोबाईल क्रमांकाचा वापर करुन गुन्हे करीत असल्याचे निष्पन्न झाले असून आरोपीचा शोध लागलेला नाही.

गुन्हयात आरोपी व माल मिळून न आल्याने गुन्हा तात्पुरता हाता वेगळा करुन गुन्हयात अ फायनल क्रमांक २६/२०१६ दिनांक २२.४.२०१६ रोजी तयार करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अनुसूचित जाती जमाती प्रतिबंधक कायद्याखाली दाखल करण्यात आलेल्या गुन्हयात शिक्षा होण्याचे प्रमाण अत्यल्प असल्याबाबत

**(८) २८६३३ (२१-०१-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर विभागात अनुसूचित जाती / जमाती प्रतिबंधक कायद्याखाली दाखल करण्यात आलेल्या ६९ प्रकरणा पैकी केवळ चार प्रकरणात आरोपींना शिक्षा झाली असून ६५ प्रकरणात आरोपी र्निदोष सुटल्याचे राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाचे अध्यक्षांनी दिनांक २३ सप्टेंबर, २०१५ रोजी नागपूर येथे जाहीर केलेल्या आकडेवारीमधून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीस दलित अत्याचारांची तक्रार घेण्यास तयार होत नसणे व तक्रार घेतलीच तर त्याला गांभिर्याने घेतले जात नसणे हे मानवाधिकाराचे उल्लंघन असून, याप्रकरणी जिल्हास्तरिय व राज्यस्तरिय व्हिजिलन्स समिती दुर्लक्ष करत असल्याचे मत आयोगाच्या अध्यक्षांनी व्यक्त केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०८-२०१६) :**(१) अनुसूचित जाती / जमाती (अत्याचारास प्रतिबंध) कायदा, १९८९ अन्वये नागपूर परिक्षेत्रामध्ये पोलीसांकडे सन २०१५ मध्ये २३९ गुन्हे दाखल झाले आहेत. सदर गुन्ह्यंपैकी ब समरी-४, एन.सी. फायनल-३, अबेटेड समरी-२, तपासावर कलम कमी-७ दोषारोपपत्र दाखल १३८ असे एकूण १५४ गुन्हे पोलीस तपासावर निकाली काढण्यात आले असून, ८५ गुन्हे पोलीस तपासावर प्रलंबित आहेत.

न्यायालयामध्ये सन २०१५ मधील दाखल गुन्ह्यापैकी १३८ गुन्ह्यामध्ये दोषारोपपत्र दाखल झाले आहेत. न्यायालयातील दाखल गुन्ह्यापैकी २ गुन्हे निर्दोष सुटले असून १३६ गुन्हे न्यायालयात प्रलंबित आहेत.

(२) अनुसूचित जाती/जमाती प्रवर्गातील व्यक्ती त्याचेवर झालेल्या अत्याचराबाबत तक्रार देण्यास आल्यास संबंधित घटक प्रमुखांकडून योग्य ती कार्यवाही करण्यात येते.

अनुसूचित जाती / जमाती (अत्याचारास प्रतिबंध) कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होणेकामी गुन्ह्यांचा आढावा घेणेत येते.

(३) फौजदारी खटल्यांमधील सिध्दापराध प्रमाण वाढविण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत महाराष्ट्र शासन गृह विभाग यांचे कडून शासन निर्णय क्र.डीपीसी-२०१२/प्र.क्र.१०/पोल-१०, दि.१२.५.२०१५ अन्वये एकूण १४ शासन निर्णय सर्व घटक प्रमुख यांना पुढील कार्यवाही करीता काढण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सातारा मध्यवर्ती बसस्थानकाजवळची अतिक्रमणे हटविण्याबाबत**

**(९) २९५५२ (१८-०१-२०१६). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा मध्यवर्ती बसस्थानकाजवळ असणाऱ्या जुन्या छत्रपती शिवाजी संग्रहालयाच्या दोन्ही बाजूला अतिक्रमणांचा वेढा असल्याने या परिसरात वारंवार वाहतूकीच्या समस्या निर्माण होऊ लागल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त ठिकाणची अतिक्रमणे हटविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१६) :**(१) होय हे खरे आहे.

श्री.छत्रपती शिवाजी संग्रहालयाच्या समोरील रस्त्याचे चौपदरीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत चालू आहे. नगरपरिषदेमार्फत सिग्नल बसविण्याची कार्यवाही चालू आहे. यानंतर वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे.

(२) सातारा मध्यवर्ती बसस्थानकाजवळ असलेला रस्ता हा राज्य महामार्ग असून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत असल्याने जून्या श्री.छत्रपती शिवाजी संग्रहालयाच्या दोन्ही बाजूला असलेले अतिक्रमण हटविणेची कार्यवाही सार्वजनिक बांधकाम व नगरपरिषदेमार्फत सयुक्तपणे केली जाते.

नगरपरिषदेमार्फत फिरते हातगाड्यांचे अतिक्रमण नगरपरिषदेने विकसात केलेल्या हॉकर्स झोनमध्ये स्थलांतरीत करण्याचे नियोजित आहे. तद् नंतर वाहतूकीची कोंडी कमी होण्यास मदत होईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक येथील भगतसिंह वसाहत व शरयुनगरीमध्ये घरगुती गॅस सिलेंडरमधील गॅस वाहनांमध्ये भरणाऱ्या अडडयांवर पोलीसांनी छापा टाकल्याबाबत**

**(१०) ३०१३१ (२१-०१-२०१६). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील भगतसिंह वसाहत व शरयुनगरीमध्ये घरगुती गॅस सिलेंडरमधील गॅस वाहनांमध्ये भरणाऱ्या अडडयांवर पोलीसांनी छापा टाकून ११ सिलेंडर दोन मशीन असा सुमारे २४ हजारांचा माल हस्तगत केला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करून संबंधितावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी इंदिरानगर पोलीस स्टेशन येथे. गु.र.नं. ३०५६/२०१५ भारतीय जीवनावश्यक वस्तू कलम ३, ७ तसेच लिक्विफाईड पेट्रोलियम गॅस ऑर्डर २००० चे कलम ३,४ प्रमाणे दि.२३/०८/२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हयात एकूण ३ आरोपींना अटक करुन त्यांच्याकडून ११ गॅस सिलिंडर, दोन मशीन असा एकूण २३,४००/- रु. किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. गुन्हयातील अटक करण्यात आलेल्या ३ आरोपींपैकी एक विधी संघर्षात बालक असून त्यास बाल न्यायालयात हजर करण्यात आले आहे. इतर आरोपीविरूध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले असून मा. न्यायालयात सदर प्रकरण प्रतिक्षाधीन आहे. मा. न्यायालयाकडून आरोपींना जामीन मंजूर करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कळवा (जि. ठाणे) पोलिस स्टेशनच्या इमारतीचे काम सुरु करण्याबाबत**

**(११) ३०७२९ (२१-०१-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळवा (जि. ठाणे) पोलिस स्टेशनच्या इमारतीचे कळवा हद्दीमध्ये भूमिपूजन होऊन वर्ष उलटले तरीही प्रत्यक्ष इमारतीच्या कामाला अदयापही सुरुवात झाली नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ च्या शेवटच्या आठवडयात निदर्शनास आलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कळवा परिसरातील वाढलेले गुन्हांचे प्रमाण विचारात घेता नागरीकांच्या समस्या सोडविण्याच्या दृष्टीने कळवा पोलिस स्टेशनच्या इमारतीच्या कामास सुरुवात करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१६) :**(१) व (२) स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच ठाणे महानगरपालिका यांच्यावतीने सदर भुमीपूजनाचा कार्यक्रम करण्यात आला आहे.

सदर पोलीस स्टेशनच्या इमारत बांधकामासाठी रु. २२१.४३ लक्ष इतक्या रकमेचे अंदाजपत्रक प्राप्त झाले असून, सदर इमारतीच्या बांधकामास निधीची उपलब्धता विचारात घेऊन प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर तसेच नवी मुंबईतील पनवेल येथे पोलिसांसाठी**
**घरे उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(१२) ३०७६९ (२१-०१-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील लकडगंज येथे पोलीसांच्या घरासाठी ३५० कोटी रुपये देण्याचा तसेच नवी मुंबईतील पनवेल येथे पोलिसांसाठी सुसज्ज अशी टाऊनशिप उभारण्याचा निर्णय दिनांक २८ ऑगस्ट, २०१५ रोजी पोलिस गृहनिर्माण विभागाच्या बैठकीमध्ये घेतलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीसांसाठी घरे उपलब्ध करुन देण्यासंदर्भात तसेच सदर बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१६) :** (१) व (२) नागपुर येथील लकडगंज येथे नागपुर सुधार प्रन्यास यांच्यातर्फे ३४८ निवासस्थानाच्या प्रकल्पाचे बांधकाम करण्यात येत आहे.

पनवेल येथे बृहन्मुंबई पोलीस सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित), पनवेल या संस्थेमार्फत पोलीस कर्मचाऱ्यांसाठी गृहनिर्माण प्रकल्प राबविण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबई येथील पोलिस मुख्यालयाच्या नवीन इमारतीचे बांधकाम अपूर्ण असल्याबाबत

**(१३) ३२२९४ (२१-०१-२०१६). डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील पोलिस मुख्यालयाच्या नवीन इमारतीचे बांधकाम माहे फेब्रुवारी, २०१३ मध्ये पूर्ण होणे अपेक्षित असताना ते अद्यापपर्यंत पूर्ण झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बांधकाम ठरल्या वेळेत पुर्ण न झाल्यामुळे या बांधकामाच्या खर्चात मोठी वाढ होवुनही कंत्राटदाराला तुटपुंजा दंड ठोठावून काम पुर्ण करण्यास सांगण्यात आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, ठरलेल्या वेळेत काम पुर्ण न करणा-या ठेकेदारावर कारवाई न करता वाढीव खर्चात मान्यता देणा-या अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१६) :**(१), (२) (३) व (४) बृहन्मुंबई येथील पोलीस मुख्यालयाच्या नवीन इमारतीचे बांधकाम दिनांक २३.१२.२०१५ रोजी पूर्ण झाले आहे. या इमारतीच्या बांधकामातील बाबींमध्ये वाढ झाल्याने काम पूर्ण करण्याचा कालावधी वाढलेला आहे. सदर इमारतीच्या प्रकल्पांच्या वाढीव बाबींकरिता आवश्यक खर्चास मान्यता देण्यात आलेल्या आहेत.

---

### विवाहासाठी इच्छुक तरुणींना संपर्क साधून फसवणूक करणाऱ्या एका विदेशी टोळीचा तपास करुन दोघांना अटक केल्याबाबत

**(१४) ३४३०६ (२१-०१-२०१६). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विवाहासाठी इच्छुक तरुणींना संपर्क साधून फसवणूक करणाऱ्या एका विदेशी टोळीचा गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी तपास करुन या टोळीतील दोन भामट्यांना दिनांक १४ ऑक्टोबर, २०१५ रोजी पोलिसांनी अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भामट्यांने एका तरुणीला सुमारे सव्वा कोटी रुपयांना फसविले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे. सदर प्रकरणी रुपये १,०१,३५,००० एवढया रकमेची फसवणूक केली आहे.
(३) सदर प्रकरणी एमएचबी कॉलनी पोलीस ठाणे, मुंबई गु.र.क्र.२७४/१५ कलम ४६५,४६७,४६८,४१९,४२०, १२० (ब) ३४ भादविसं सह माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६ (सी), ६६ (डी) व नियम क्र. ३ सह ६ पारपत्र (भारतात प्रवेश) कायदा सह ३ (१) परकीय नागरीक ओदश सह १४ परकीय नागरीक कायदा १९४६ अन्वये गुन्हा नोंद करुन एकूण १० आरोपींना अटक करुन त्यांच्याकडून नमूद गुन्ह्यात एकूण रुपये २७,५७,६९/- ची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे आरोपीविरुध्द मा.मुख्य महानगर दंडाधिकारी, ६८ वे न्यायालय, बोरिवली न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आलेले आहे. सदरचा गुन्हा न्याय प्रविष्ठ आहे.

---

**रामनगर (जि.चंद्रपूर) पोलिस ठाण्यात हायटेक बिझनेस नेटवर्क या कंपनीच्या विरोधात केलेल्या तक्रारीबाबत**

**(१५) ३५०३७ (२१-०१-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रामनगर (जि.चंद्रपूर) पोलिस ठाण्यात हायटेक बिझनेस नेटवर्क या कंपनीच्या विरोधात कोट्यावधी रूपयांची फसवणूक केल्याची तक्रार दि.४ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास नोंदविण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी पोलिसांनी अधिक तापास केला आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) होय.

सदर प्रकरणी पोलीस स्टेशन, रामनगर, चंद्रपुर येथे अप. क्र.४४१/१५ भा.दं.वि. कलम ४२०, ३४ सहकलम ३ ठेवीदारांचे हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम १९९९ सह कलम ४ मनीलॅडींग ॲक्ट.२००१ प्रमाणे एकूण ७ आरोपीविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर प्रकरणी एच.बी.एन डायरीज अलायस अलाईड लि. या कंपनीचे मॅनेजिंग डारेक्टर अमनदिपसिंग सरन यास ग्राहकांची फसवणूक केली असल्याच्या गुन्हयाबाबत छत्तीसगढ

पोलिसांनी अटक केली असून तो सध्या रायपुर जेलमध्ये एम.सी.आर.वर आहे. त्यास प्रोडक्शन वॉरंटवर आणून पोलीस स्टेशन रामनगर, चंद्रपुर येथील नोंद गुन्हयात अटक करण्यासाठी मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, रायपुर यांना मा. सी.जे.एम. कोर्ट यांचे मार्फत दिनांक २९ सप्टेंबर, २०१५ व २७ ऑक्टोबर, २०१६ रोजी विनंती करण्यात आली आहे. तथापि मा. रायपुर न्यायालयाने सदर आरोपीस ताब्यात दिलेले नाही. सदर आरोपीस प्रोडयुस वॉरंटवर ताब्यात घेण्याची कार्यवाही चालू आहे. तसेच उर्वरित ६ आरोपी हे रायपुर येथील राजेंद्र नगर पोलीस स्टेशन येथे नोंद असलेल्या गुन्हयात आरोपी असल्यामुळे सदर ६ आरोपींचा शोध घेण्यासाठी रायपुर पोलिसांशी संपर्क ठेवलेला आहे. गुन्हा पोलीस तपासावर प्रलंबित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्हयातील कुंडलिका नदीवरील रेवदंडा ते रोहे या जलमार्गावरील कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(१६) ३५७०७ (२०-०१-२०१६). श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील कुंडलिका नदीवरील रेवदंडा ते रोहे या जलमार्गावर इतर २ जलमार्गाचा समावेश विकास आराखड्यात केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकसित करावयाच्या उर्वरित २ जलमार्गाची नावे काय आहेत तसेच त्यांचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, सदर जलमार्गाच्या विकास आराखड्यात कोणकोणती कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत,

(४) असल्यास, सदर जलमार्गाची कामे सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०९-२०१६) :**(१) प्रस्तावित National Waterways Bill, २०१५ मध्ये रायगड जिल्हयातील रेवदांडा खाडी/कुंडलिका नदी जलमार्ग हा राष्ट्रीय जलमार्ग म्हणून घोषित करावयाच्या यादीमध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. तसेच सदर जलमार्गाचा विकास आराखडयात समावेश केलेला आहे.

(२) (३) (४) व (५) भारतीय अंतर्देशिय जलमार्ग प्राधिकरण (IWAI) यांनी Tractee; Engineering Pvt.Ltd. Gurgaon-Hariyana या कंपनीस (१) वसई खाडी-मुखापासून ते कल्याण व्हाया कशेळी ते मुंबई (ठाणे खाडी) ते धरमतर खाडी अंदाजे १४० कि.मी. (२) राजपूरी खाडी-मूखापासून ते मांदाड व्हाया वाशी अंतर अंदाजे २८ कि.मी. (३) बाणकोट खाडी/सावित्री नदी-मुखापासून ते आंबेत अंतर अंदाजे ४१ कि.मी. (४) दाभोळ खाडी/ वशिष्ट नदी- मुखापासून ते करंभवणे अंतर अंदाजे ४२ कि.मी. (५) जयगड खाडी/ शास्त्री नदी-

मुखापासून ते फुणगुस अंतर अंदाजे ४८ कि.मी. (६) रेवदंडा खाडी/ कुंडलिका नदी-मुखापासून ते सानेगाव २२ कि.मी या जलमार्गाच्या विकासासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (detailed Project Report) तयार करण्याच्या कामाचे आदेश दिलेले आहेत.

---

## भिवंडी शहरातील दिवाणी व फौजदारी न्यायालयाला लागून असलेल्या अनधिकृत उपहारगृहाबाबत

**(१७) ३६९९२ (२१-०१-२०१६). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी शहरातील दिवाणी व फौजदारी न्यायालयाला लागून असलेल्या २० बाय ५० चौ.फुटांचे उपहारगृह महापालिका, सार्वजनिक बांधकाम व शासनाच्या इतर विभागाची परवानगी न घेता सन २०१० पासून अनधिकृतरित्या सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर उपहारगृहाच्या व्यवस्थापकाने मुंबई दुकाने अधिनियामातंर्गत आवश्यक असणारे कोणतेही परवाने घेतले नसून उपहारगृहाकडे स्वत:चे वीजमीटर नसून न्यायालयातील विजेचा वापर अनधिकृतरित्या असून उपहारगृह न्यायालयाच्या आवारातील सांडपाण्याचा निचरा करणाऱ्या मुख्य गटारावर भराव टाकल्यामुळे तेथील वकिल, पक्षकार व नागरिक यांना सांडपाण्यातून ये-जा करावे लागत असून तेथे डासांचे प्रमाणही वाढले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त दोन्ही प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद् नुसार सदर उपहारगृह हटविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०८-२०१६) :**(१) होय.

(२) अंशत: खरे आहे. सदर उपहारगृहाच्या व्यवस्थापकाने कोणतेही परवाने घेतले नव्हते. सदर उपहारगृहाकडे स्वत:चे वीज मिटर नव्हते. भिवंडी न्यायालयाच्या बार रुमच्या विजेच्या मीटरवरुन विजेची जोडणी घेतली होती. मात्र उपहारगृह न्यायालयाच्या आवारातील सांडपाण्याचा निचरा करणाऱ्या मुख्य गटारावर भराव टाकल्यामुळे तेथील वकिल, पक्षकार व नागरीक यांना सांडपाण्यातून ये-जा करावे लागत असून तेथे डासांचे प्रमाणही वाढले आहे हे खरे नाही. त्या जागी सांडपाण्याचा निचरा करणारे गटार नाही.

(३) मा.उच्च न्यायाललयाने दि. ५/३//१६ रोजी दिलेल्या निर्देशानुसार सदर उपहारगृह बंद करण्यात आले असून त्याचे कच्चे बांधकाम पाडून टाकण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी येथे रेल्वे गाडीत पिस्तुल व तलवारीचा धाक दाखवून**
**१ लाखांचा ऐवज लुटण्यात आल्याबाबत**

**(१८) ३९९०९ (२०-०५-२०१६). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी रेल्वे स्थानकामध्ये थांबलेल्या मत्स्यगंधा एक्सप्रेसमध्ये पिस्तुल व तलवारीचा धाक दाखवून १ लाखांचा ऐवज लुटण्यात आल्याचे दिनांक २३ डिसेंबर, २०१५ वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गुन्हयाप्रकरणी तपास करुन कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०९-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) तथापि या घटनेची चौकशी केली असता सदरची घटना ट्रेनमधील प्रवासात बसायला सीट दिली नाही या कारणावरून जमावाकडून किरकोळ मारहाणीचा प्रकार घडलेला आहे. मारहाणीचे वेळी खबर देणार यांचे गळयातील सोन्याची चेन तुटून गेलेली आहे. याघटनेत पिस्तुल, तलवारीचा वापर झालेला नाही किंवा ऐवज लुटून नेलेला नाही. तद्वतच तपासामध्ये खबर देणार यांनी तक्रार परत घेतल्याचे पोलीस अधीक्षक यांना निवेदन दिलेले आहे. सदर प्रकरणी रत्नागिरी शहर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ४००/२०१५ भादंविसं कलम १४३,१४७,१४९,३२३ प्रमाणे ५ आरोपीविरूध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले आहे. गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**समृद्ध जीवन कंपनीने राज्यातील अनेक ठेवीदारांना फसविले असल्याबाबत**

**(१९) ४०४६४ (१७-०५-२०१६). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समृध्द जीवन या चिटफंड कंपनीने ठेवीदारांची फसवणूक केल्याप्रकरणी करण्यात येणारा तपास शासनाने गुन्हे अन्वेषण विभागाकडे सोपविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सेबी चे सहाय्यक महाव्यवस्थापक श्री. सचिन ए.सोनावणे यांनी पुण्याच्या डेक्कन जिमखाना पोलीस स्टेशनमध्ये समृध्द जीवन या कंपनीचे प्रमुख श्री. महेश मोतेवार यांच्याविरुध्द सेबी ची परवानगी न घेता लोकांकडून बेकायदेशीर आर्थिक गुंतवणुक करुन घेत असल्याबद्दल फिर्याद देऊन वैशाली मोतेवार, घनश्याम पटेल, राजेंद्र भंडारे यांच्या विरोधात भा.द.वि. कलम ४२०, १८८, १२० (ब) नुसार गुन्हा नोंदविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कंपनीने ठेवीदारांकडून ठेवी स्वीकारण्यास 'सेबी' ने मनाई केल्यानंतरही अनेकांकडून ठेवी घेतल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच मोतेवार याच्या खाजगी सुरक्षा रक्षकांनी पत्रकारांना धक्काबुक्की केल्याची तक्रारही उस्मानाबाद पोलीस स्थानकात दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्या दरम्यान करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच ठेवीदारांचे पैसे परत मिळवून देण्यासाठी काय उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.

सदर प्रकरणी पुणे पोलीस आयुक्तालयाचे परिक्षेत्रातील डेक्कन पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि.नं. ३२३/२०१५ भादंवि कलम ४२०, १८८, १२० (ब) एम.पी.आय.डी कलम ३ व ४ अन्वये दि. ३१.१०.२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(३) सदर कंपनीने ठेवीदारांकडून ठेवी स्विकारण्यास सेबी ने मनाई केल्यानंतर ठेवी स्विकारल्याचे तपासात अद्याप पावेतो समोर आले नाही. परंतु सदर कंपनी व समृध्द जीवन मल्टी स्टेट मल्टी पर्पज को. ऑ. सोसायटी लि.यांच्यामध्ये एम.ओ.यु.होवून सदर कंपनीने व्यवसाय समृध्द जीवन मल्टी स्टेट मल्टी पर्पज को.ऑ.सोसायटी लि.यांचेकडे हस्तांतरीत केला असून त्यांनी ठेवी स्विकारल्याचे तपासात आतापर्यंत समोर आलेले आहे.
(४) हे खरे आहे.
(५) सदर प्रकरणी फिर्यादीचे तक्रारीवरुन तीन आरोपीविरुध्द पोलीस स्टेशन, उस्मानाबाद शहर येथे अदखलपात्र गु.र.नं. १४३६/२०१६ कलम ३२३, ५०६, ३४ भादंवि प्रमाणे व गु.र.नं. १४३७/२०१६ कलम ३२३, ३४ भादंवि प्रमाणे असे दोन अदखलपात्र गुन्हे दाखल केले आहेत.

उक्त नमूद गुन्ह्यातील एका आरोपीस अटक करुन न्यायालयात हजर केले असता मा.न्यायालयाने आरोपींस जामिनावर सोडले आहे. इतर २ आरोपीविरुध्द तक्रार नसल्याने त्यांना कलम १४९ प्रमाणे नोटीस व ताकीद देवून सोडण्यात आले आहे.

तसेच ठेवीदारांचे पैसे परत मिळवून देण्यासाठी महाराष्ट्र ठेवीदारांचे (वित्तीय आस्थापनामधील) हितसंबंधाचे संरक्षण करण्याबातचा अधिनियम कलम ४ मध्ये नमूद तरतूदीनुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**ठाणे पोलिस आयुक्तालय क्षेत्रातील कळवा पोलिस ठाण्याची इमारत उभारण्याबाबत**

**(२०) ४०५९५ (२०-०५-२०१६). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे पोलिस आयुक्तालय क्षेत्रातील स्वतंत्र कळवा पोलिस ठाणे निर्माण करण्याची मागणी गत पंधरा वर्षापासून होत असून सद्य स्थितीत जुन्या आरटीओ कार्यालयाजवळ असलेल्या कळवा पोलिस ठाण्याची अत्यंत दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कळवा पोलिस ठाण्याच्या नियोजित इमारतीचे भूमी पूजन दिनांक ०७ सप्टेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पोलिस ठाण्याची इमारत उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच ठाणे महानगरपालिका यांच्यावतीने सदर भुमिपूजनाचा कार्यक्रम करण्यात आला आहे.

(३) सदर पोलीस स्टेशनच्या इमारत बांधकामासाठी रु. २२१.४३ लक्ष इतक्या रकमेचे अंदाजपत्रक प्राप्त झाले असून, सदर इमारतीच्या बांधकामास निधीची उपलब्धता विचारात घेवून प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबरनाथ (प) ( जि.ठाणे) येथील पोलिस ठाणे जीर्ण अवस्थेत असल्याबाबत**

**(२१) ४०६२३ (२०-०५-२०१६). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (प) (जि.ठाणे) येथील पोलिस ठाणे हे अत्यंत जीर्णअवस्थेत असल्यामुळे नागरीक तसेच तेथील पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांची गैरसोय होत असून त्याजागी नविन इमार बांधणे संदर्भात मा. राज्यमंत्री गृह (शहरे) यांचेकडे दिनांक ११ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास नागरीकांनी व लोकप्रतिनिधींनी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, याबाबत विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१६) :**(१) होय.

(२) ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ पोलील स्टेशन व सहाय्यक आयुक्त, अंबरनाथ यांच्या कार्यालयाच्या इमारतीच्या बांधकामासाठी रु. ५६५.७३ लक्ष इतक्या खर्चाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण महामंडळाकडून करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चाकण नगरपरिषद (जि. पुणे) हद्दीत मलेरिया आणि**
**डेंगूच्या रुग्णांमध्ये वाढ झाल्याबाबत**

**(२२) ४०८६९ (१६-०५-२०१६). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकण नगरपरिषद (जि. पुणे) हद्दीत रस्त्यावर कचऱ्याचे पडलेले ढीग, तुंबलेली व उघडी गटारे, रस्त्यावर वाहणारे सांडपाणी यामुळे मच्छरांची पैदास होऊन डेंगू आणि मलेरियाच्या रुग्णांमध्ये माहे जानेवारी, २०१६ वा त्यादरम्यान वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुख्यधिकारी, चाकण यांस रस्त्यावर कचऱ्याचे पडलेले ढीग, तुंबलेली व उघडी गटारे, रस्त्यावर वाहणारे सांडपाणी यामुळे मच्छरांची होणारी पैदास बंद करण्याबाबत दिनांक १८ जानेवारी २०१६ रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊनही कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहे डिसेंबर, २०१५ - जानेवारी, २०१६ वा त्यादरम्यान डेंगू आणि मलेरियामुळे शाळकरी मुलासह २ व्यक्तींचा बळी गेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-११-२०१६) :** (१) हे खरे नाही. माहे डिसेंबर, २०१५ ते फेब्रुवारी, २०१६ या कालावधीत मलेरियाच्या रुग्णांमध्ये वाढ झालेली नाही. वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय, चाकण यांनी मुख्याधिकारी, नगरपरिषद, चाकण यांना कळविल्यानुसार सप्टेंबर, २०१६ मध्ये एका रुग्णास मलेरीया झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) सदर प्रकरणी नगरपरिषद चाकण यांचेमार्फत पुढील कार्यवाही करण्यात आली :-

अ) शहरातील सर्व कचरा घंटागाडीमार्फत संकलित करणे,

ब) सदर संकलित कचऱ्याची नगरपरिषद हद्दीबाहेर क्षेत्रात स्वतंत्रपणे विल्हेवाट लावणे,

क) नगरपरिषद हद्दीतील गटारांची नियमितपणे दुरुस्ती करणे, साफसफाई करणे त्याचप्रमाणे लोकप्रतिनिधी व नागरीकांच्या सहभागातून स्वच्छता मोहिम राबविणे,
ड) औषध फवारणी, रिक्षा फिरवून जनजागृती करणे, माहितीपत्रके वाटणे इत्यादी उपयायोजना स्वच्छतेच्या अनुषंगाने नगरपरिषदेने राबविल्या आहेत व नियमित राबवत असते.

त्यामुळे मुख्याधिकारी नगरपरिषद चाकण यांना निवेदन देऊनही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही अशी परिस्थिती आढळून आली नाही.

(३) हे खरे आहे.

(४) सदर प्रकरणी नगरपरिषदेमार्फत आरोग्य विषयक सर्वंकष उपाययोजना राबविण्यात आल्या होत्या.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खराबवाडी (ता.खेड,जि.पुणे) येथे बलात्कार केलेल्या**
**महिलेचा मृतदेह आढळून आल्याबाबत**

**(२३) ४१०६१ (२०-०५-२०१६). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खराबवाडी (ता.खेड, जि.पुणे) येथे बलात्कार केलेल्या महिलेचा मृतदेह दिनांक २१ नोव्हेबर, २०१५ रोजी आढळून आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चाकण औद्योगिक क्षेत्रात रस्त्यालगत महिलांवरील बलात्कार व छेडछाड करण्याचे प्रमाण वाढल्याचे माहे जानेवारी, २०१६ वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, महिलांच्या सुरक्षेबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०८-२०१६) :**(१) होय.

सदर प्रकरणी चाकण पोलीसस्टेशन येथे अकस्मात मयत रजिस्टर नं. १८८/२०१५, सी.आर.पी.सी. १७४ अन्वये मयत रजिस्टरी दाखल करण्यात आले आहे

(२) नाही.

(३) महिलांच्या सुरक्षेबाबत पोलीस स्टेशन स्तरावर दामिनि स्कॉड स्थापन करण्यात आले असून, त्यामध्ये महिला पोलीस कर्मचारी या मोटार सायकलवर पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग करतात तसेच पोलीस स्टेशन हद्दीत पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची गस्त व पेट्रोलिंग नेमली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बासंबा (जि.हिंगोली) या गावातील निझामकालीन पोलीस ठाण्याच्या इमारतीची दुरवस्था झाल्याबाबत**

**(२४) ४१३४३ (१७-०५-२०१६). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बासंबा (जि.हिंगोली) या गावातील निझामकालीन पोलीस ठाण्याच्या इमारतीची अत्यंत दुरवस्था झाली असून या ठिकाणी पिण्याचे पाणी नसणे तसेच स्वच्छतेचा अभाव असून याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे माहे जानेवारी २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पोलीस ठाण्याची दुरवस्था सुधारण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) हिंगोली जिल्ह्यातील बासंबा पोलीस ठाण्याची इमारत बांधण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सुधारीत दरसूचीवर आधारीत अंदाजपत्रक नकाशे तयार करण्यात येऊन निधीची उपलब्धता विचारात घेऊन प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरातील चंदनाची झाडे चोरणारी टोळी पकडल्याबाबत**

**(२५) ४२१४२ (१७-०५-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात चंदनाची झाडे चोरणा-या टोळीला गुन्हे शाखेच्या वतीने पकडले असल्याचे दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) गुन्हे शाखे अंतर्गत कार्यरत असलेल्या दरोडा प्रतिबंधक पथकाने दिनांक ३०.१२.२०१५ रोजी चार आरोपींना अटक करुन त्यांचेकडून पुणे शहरात चंदनाची झाडे चोरले संबंधित दाखल असलेले पुढील गुन्हे उघडकीस आणले आहेत.

| अ.क्र. | पोलीस स्टेशन | गु.र.न. व कलम | गेला माल (रुपये) | मिळाला माल (रुपये) | सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|---|
| १ | कोरेगाव पार्क | १२०/१५ भादंवि क ३९५ | २०,०००/- | १,४०,३५०/- गाड्या व चंदनाच्या झांडाचे तुकडे व इतर सामान | न्यायालयात दोषारोपपत्र दाखल |
| २ | कोरेगाव पार्क | ८३/१५ भादंवि क ३७९ | १०,०००/- | १०,०००/-चंदनाच्या झांडाचे तुकडे | तपासावर |
| ३ | कोरेगाव पार्क | १०५/१५ भादंवि क ३७९ | १०,०००/- | १०,०००/-चंदनाच्या झांडाचे तुकडे | तपासावर |
| ४ | लष्कर | १८२/१५ भादंवि क ३७९ | ५,०००/- | - | न्यायालयात दोषारोपपत्र दाखल |
| ५ | लष्कर | २४/१५ भादंवि क ३७९ | ५,५००/- | - | न्यायालयात दोषारोपपत्र दाखल |
| ६ | बिबवेवाडी | ८३/१५ भादंवि क ३७९, ३४ | १०,०००/- | - | तपासावर |
| ७ | बिबवेवाडी | १२०/१५ भादंवि क ३७९, ३४ | ३,०००/- | - | तपासावर |
| ८ | येरवडा | ५९४/१५ भादंवि क ३९२, ३४१, ३४ | ८,०००/- | ५,०००/-चंदनाच्या झांडाचे तुकडे | न्यायालयात दोषारोपपत्र दाखल |
| ९ | येरवडा | ५८२/१५ भादंवि क ३७९ | १५,५००/- | १५,०००/-चंदनाच्या झांडाचे तुकडे | तपासावर |
| १० | येरवडा | १२७/१५ भादंवि क ३७९ | ५,०००/- | ५,०००/-चंदनाच्या झांडाचे तुकडे | तपासावर |
| ११ | येरवडा | ५१३/१५ भादंवि क ३७९ | ३,०००/- | ३,०००/-चंदनाच्या झांडाचे तुकडे | तपासावर |
| १२ | हडपसर | ६२७/१५ भादंवि क ३७९, ३४ | ४,५००/- | १,०००/-चंदनाच्या झांडाचे तुकडे | तपासावर |

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कर्डे (ता.शिरुर, जि.पुणे) गावामध्ये बांदल कुटूंबियांच्या घरावर दरोडा टाकून केलेल्या हल्याबाबत**

**(२६) ४२८६५ (१७-०५-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्डे (ता.शिरुर,जि.पुणे) गावामध्ये बांदल कुटूंबियांच्या घरावर दिनांक ४ डिसेंबर, २०१५ रोजी दरोडेखोरांनी दरोडा टाकून केलेल्या हल्यामध्ये कुटुंबप्रमुख मच्छिद्र बांदल यांचा उपचारा दरम्यान मृत्यू होऊन कुटुंबातील चौघे जण गंभीर जखमी झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दरोडयाच्या घटनांमध्ये मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तींना शासकीय मदत देणेबाबत तसेच कर्डे येथील दरोडयाचा तपास लावणे बाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०८-२०१६) :** (१) कर्डे, ता. शिरुर, जि. पुणे या गावामध्ये बांदल कुटूंबियांचे घरावर दिनांक ४ डिसेंबर, २०१५ रोजी दरोडेखारांनी दरोडा टाकून केलेल्या हल्ल्यामध्ये कुटुंबमध्ये मच्छिंद्र बांदल यांचा उपचारादरम्यान मृत्यू झालेला आहे. तसेच दोघेजण गंभीर जखमी झालेले आहेत.

(२) दरोडयासारख्या घटनांमध्ये मृत्यूमुखी पडल्यास शासकीय मदत देण्यात आलेली नाही तसेच सदर प्रकरणी ६ आरोपीविरुध्द शिरुर पोलीस ठाणे येथे गु.रनं. ४०३/२०१५, भा. दं. वि. कलम ३९५,३९६,३९७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून एका आरोपीस अटक करण्यात आली आहे. गुन्ह्याचा तपास चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्ह्यातील गुन्हेगारीबाबत**

**(२७) ४४९४० (२४-०५-२०१६). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गुन्हेगारीचा आढावा घेणाऱ्या महाराष्ट्र गुन्हेगारी २०१४ च्या अहवालाप्रमाणे गुन्हेगारीत अहमदनगर जिल्ह्याचा पाचवा क्रमांक लागत असून तब्बल एक हजाराहून अधिक हिंसेचे गुन्हे तसेच दंगलीचे ४७६ गुन्हे दाखल झालेले असून जिल्ह्यातील कायदा सुव्यवस्था कोलमडली असल्याचे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१६)** :(१) अहमदनगर जिल्ह्यात सन २०१४ मध्ये खून ११४, खूनाचा प्रयत्न ७३ बलात्कार १०४, दुखापत ७१९ असे एकूण १०१० गुन्हे दाखल आहेत तसेच सन २०१३ मध्ये खून ११३, खूनाच्या प्रयत्न ७१, बलात्कार १०३, दुखापत ७०५, असे एकूण ९९२ गुन्हे दाखल आहेत. सन २०१४ मध्ये हिसांचाराच्या गुन्ह्यात केवळ १८ गुन्ह्यांनी वाढ झाली आहे.

तसेच दंगा या शिर्षकाखाली सन २०१४ मध्ये ५२० गुन्हे दाखल असून सन २०१३ मध्ये ५४४ गुन्हे दाखल आहेत. सन २०१३ च्या तालुनेत सन २०१४ मध्ये दंगा या शिर्षकाखाली २४ गुन्ह्यांची घट झालेली आहे. अहमदनगर जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती कोलमडलेली नसून कायदा व सुव्यवस्था अबाधित आहे.

(२) अहमदनगर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्थेबाबत वेळोवळी गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत तसेच कोंम्बींग ऑपरेशन करण्यात आलेले आहेत. संवदेनशील ठिकाणी फिक्स पॉईंट नेमून पेट्रोलिंग ठेवण्यात येवून शांताता कमिटीच्या बैठका घेण्यात आलेल्या आहेत.

(३) विलंब झालेला नाही.

---

## खानापूर (जि.सांगली) येथे नविन पोलिस स्टेशन उभारण्याबाबत

**(२८) ४५३५० (१६-०५-२०१६). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खानापूर (जि.सांगली) येथे नविन पोलिस स्टेशन उभारण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या सुमारास मा. गृह राज्यमंत्र्यांकडे पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त परिसरात मोठया प्रमाणात चोऱ्या, दरोडे होत असल्याने उक्त पत्राच्या अनुषंगाने पोलिस स्टेशन उभारण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-१०-०१६६) :** (१) होय.

(२) खानापूर (जि.सांगली) येथे पोलीस ठाणे स्थापन करणेबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयातील देगलूर पोलिस ठाणे अंतर्गत दूरक्षेत्र करडखेड येथील नविन इमारत व कर्मचा-यांसाठीची निवासस्थाने तसेच पोलिस चौकी (दूरक्षेत्र) च्या कार्यालयाची इमारत व संरक्षक भिंत बांधण्याबाबत**

**(२९) ४५९९९ (२०-०५-२०१६). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील देगलूर पोलिस ठाणे अंतर्गत दूरक्षेत्र करडखेड येथील नविन इमारत व कर्मचा-यांसाठीची निवासस्थाने तसेच मरखेल येथील पोलिस ठाण्याची नविन प्रशासकीय इमारत बांधकाम करण्यासंबधीचा प्रस्ताव दिनांक १५ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या पत्रान्वये पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून मागविण्यात आला तसेच उक्त ठिकाणी पोलिस चौकी (दूरक्षेत्र) च्या कार्यालयाची इमारत व संरक्षक भिंत बांधण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधीनी दिनांक २४ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बांधकामांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) उपलब्ध निधी विचारात घेऊन प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हयात पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने बांधण्याबाबत**

**(३०) ४६४१२ (१७-०५-२०१६). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी फक्त ८९६ निवासस्थाने असून तब्बल दोनहजार पाचशे नवीन घरांची आवश्यकता असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कपासु- ०५१३/प्र.क.१७२/१३ पोल दिनांक २९ जुन २०१३ अन्वये पोलीस स्टेशन रामनगर येथे पोलीस अधिकाऱ्यांकरिता १३ व पोलीस कर्मचाऱ्यांकरिता १४३ निवासी इमारत आणि कपासु-०९१३/प्र.क.-३३०/पोल-७ अन्वये घुग्घुस येथे पोलीस अधिकाऱ्यांकरिता ५ आणि कर्मचाऱ्यांकरिता ७३ निवासी इमारत अशी एकुण २४३ निवासस्थाने मंजूर असून अद्यापही बांधकाम सुरु झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने चंद्रपूर शहर आणि मौजा घुग्घुस येथील मंजूर २४३ निवासस्थानांचे बांधण्याबाबत कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१६)** :(१) होय.

(२), (३) व (४) चंद्रपूर शहरात पूर्वी १५६ निवासस्थाने बांधण्याचे प्रस्तावित होते. परंतु सन २०१५-१६ मध्ये १५६ निवासस्थाने रद्द करुन चंद्रपूर पोलीस मुख्यालय परिसरात ३६४ निवासस्थाने मंजूर करण्यात आले असून सदर बांधकामाची निविदा प्रक्रिया पार पडलेली आहे. सदरचे बांधकाम पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ यांच्यामार्फत होणार आहे.

पोलीस ठाणे घुग्घुस येथे ०५ अधिकारी व ७३ कर्मचारी असे कएूण ७८ निवासस्थाने बांधावयाचे प्रस्तावित असून महसूल खात्याच्या ताब्यात असलेली मौजा घुग्घुस मापन क्र. २९ मधील २ हेक्टर आर जमिन मिळणेबाबत जिल्हास्तरावर महसूल विभागाकडे पाठपुरावा सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**घाटंजी (जि. यवतमाळ) येथील विज वितरण कंपनीच्या डी.पी मधील कथिल या धातूच्या पात्याची चोरी होत असल्याबाबत**

**(३१) ४६५३७ (२०-०५-२०१६). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटंजी (जि. यवतमाळ) येथील विज वितरण कंपनीच्या डी.पी मधील कथिल या धातूच्या पात्याची चोरी केल्याचे निदर्शनास आले असून एका डी.पी.मध्ये किमान ७ ते १० पट्या निघत असल्याने परिसरातील २० ते २५ डी. पी. मधील १ ते १.५ क्विटल पाट्या चोरीला गेल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१६) :** (१) हे खरे नाही.

तथापि घाटंजी येथे वीज वितरण कंपनीच्या डी.पी. फोडून त्यामधील तांब्याची तार चोरुन नेल्याच्या सन २०१५ मध्ये ४ व सन २०१६ मध्ये २ घटना घडल्या प्रकरणी विज वितरण कंपनीच्या संबंधित अधिकाऱ्यांनी पोलीस स्टेशन घाटंजी येथे तक्रारी दिल्याने गुन्हे नोंद आहेत.

(३) विज वितरण कंपनीच्या डी.पी. फोडून त्यामधून तांब्याजी तार चोरुन नेल्या प्रकरणी पोलीस स्टेशन घाटंजी येथे सन २०१५ मध्ये ४ व सन २०१६ मध्ये २ असे कएूण ६ गुन्हे भारतीय विद्युत अधिनियमाच्या कलम १३६ प्रमाणे नोंद करुन त्यांचा तपास करण्यात आलेला आहे सन २०१५ मध्ये नोंद असलेल्या ४ गुन्हयात २०२ किलो ताब्याजी तार किंमन अंदाजे रुपये ४४,६१६/- व सन २०१६ मध्ये २ गुन्हयात ९५ किलो तांब्याची तार किंमत अदाजे रु. १२,६२५/- ची चोरी झाली आहे. सन २०१६ मधील नोंद ४ गुन्हयापैकी १ गुन्हा उघकीस

आला असून त्यातील २ आरोपींना अटक करुन ६० किलो तांब्याजी तार हस्तगत करण्यात आली आहे. सन २०१५ मध्ये दोन गुन्ह्यात आरोपींचा शोध न लागल्याने “अ” समरी मंजूरीसाठी संबंधित न्यायालयात पाठविण्यात आली आहे उर्वरित सन २०१५ मधील २ व सन २०१६ मधील २ अशा ४ गुन्ह्याचा सखोल तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जळगांव जिल्हयात ठिकठिकाणी बेकायदेशीर कॉल सेटरच सुरु करुन तरुणांना नोकरीच्या नावाने फसवण्यात येत असल्याबाबत**

**(३२) ४७९४० (२४-०५-२०१६). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हयात ठिकठिकाणी बेकायदेशीर कॉल सेंटर सुरु करुन नोकरीसाठी अर्ज केला नसतांनाही मुलाखतीसाठी निवड झाल्याचे मेल, बनावट लेटरहेडवर ऑर्डर देणे, संबंधित कंपनीची ओळख सांगणाऱ्या या लेटरहेडवर कंपनीचा लोगो वापरणे आदि प्रकार सर्रासपणे सुरु असून तरुणांना नोकरीच्या नावाने फसवण्यात येत असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्हयात दरवर्षी सरासरी ३५ ते ४० जणांच्या फसवणूकीच्या घटणा घडत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कंपन्या, एजन्सींजचा शोध घेऊन त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१६) :** (१), (२) व (३) सदर प्रकरणी जळगांव जिल्हयातील पोलीस स्टेशनमध्ये तक्रार / गुन्हा दाखल झालेला नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जळगांव प्रादेशिक परिवहन विभागाने कारवाई करुन तालुका पोलिस स्टेशनला जमा केलेल्या रिक्षाचे टायर व बॅटरी चोरी झाल्याबाबत**

**(३३) ४७९४९ (१७-०५-२०१६). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव प्रादेशिक परिवहन विभागाने कारवाई करुन तालुका पोलिस स्टेशनला जमा केलेल्या रिक्षाचे टायर व बॅटरीच्या चोरीबाबत पोलिस व आरटीओ अधिकारी जबाबदारी स्विकारत नसल्याचे पाहून रिक्षाचालकांनी दिनांक ७ जानेवारी, २०१६ रोजीच्या सुमारास आरटीओ कार्यालयात अंगावर रॉकेल ओतून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात कोणती कारवाई करण्यात आली येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०८-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) दिनांक २३.१२.२०१५ रोजी प्रादेशिक परिवहन अधिकारी, जळगाव यांनी ऑटो रिक्षा क्र. MH १९ AX ३२३६ यातून अवैध प्रवासी वाहतूक सुरु असल्या कारणाने ताब्यात घेऊन तालूका पोलीस स्टेशन च्या आवारात लावली होती. सदर ऑटोतील टायर व बॅटरी चोरी गेल्याच्या कारणामूळे एका इसमाने प्रादेशिक परिवहन कार्यालय जळगावच्या पायरीजवळ स्वत:च्या अंगावर रॉकेल ओतून आत्महत्येचा प्रयत्न केला होता. याबाबत सहायक मोटार वाहन निरीक्षक, जळगाव यांनी दिलेल्या तक्रारी वरुन आत्महत्या करणाऱ्या इसमाविरुध्द रामानंदनगर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं ०२/२०१६ भाग-५, भादवि कलम ३०९ नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर प्रकरणी आत्महत्या करणाऱ्या इसमास अटक करण्यात आली असून सध्या अटक आरोपी जामिनावर मुक्त आहे सदर प्रकरणाचे दोषारोप पत्र न्यायालयात दाखल केले असून गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वेंगुर्ले (जि.सिंधुदूर्ग) तालुक्यातील अणसूर नजीकच्या पाल गावात मेरीटाईम बोर्डने जेटी व संरक्षक भिंतीचे काम सुरु केल्याबाबत**

**(३४) ४८१५० (२०-०५-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वेंगुर्ले (जि.सिंधुदूर्ग) तालुक्यातील अणसूर नजीकच्या पाल या आडवळणाच्या छोटयाश्या गावात मेरीटाईम बोर्डाने तेथील नदीकिनारी गरज नसताना देखील गतवर्षी ६४ लाख ८२ हजार ८४३ रुपयांचा निधी खर्च करुन जेटी व संरक्षक भिंतीचे काम सुरु केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त काम सुरु असतानाच याच खात्याने यावर्षी याच ठिकाणी आणखी एक जेटी व संरक्षण भिंतीच्या उभारणीसाठी रुपये ७५ लाखाचा निधी मंजूर करुन घेत निविदा प्रक्रियाही पूर्ण केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) तदनुसार यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवर शासनस्तरावर काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१६) :**(१) ग्रामपंचायत पाल यांचे मागणीनुसार महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डामार्फत पाल झेंडोबा मंदिर येथे जेट्टी व संरक्षक भिंतीचे काम हाती घेण्यात येऊन मे २०१६ अखेर काम पूर्ण करण्यात आली आहे.

(२) ग्रामपंचायत पाल यांनी भेंडशीचा बांध येथे जेट्टीच्या बाजूला संरक्षक भिंत बांधण्याची मागणी केल्यानुसार तसेच प्रादेशिक बंदर अधिकारी, वेंगुर्ला यांच्या शिफारशी नुसार सदरचे काम हाती घेण्यात आले. सदर कामास रु. ७५.०० लक्ष किंमतीस महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डातर्फे प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. व त्यानुसार सदर काम माहे जानेवारी, २०१६ मध्ये पूर्ण करण्यात आले,
(३), (४) व (५) सदरील कामे ग्रामपंचायतीच्या मागणीनुसार करण्यात आलेले असल्याने चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात जखमी पोलीसांना शौर्यपदक देण्याबाबत

**(३५) ४८२६२ (२०-०५-२०१६). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईवर दिनांक २६ नोव्हेंबर, २००८ रोजी झालेल्या दहशतवादी हल्यात जखमी झालेल्या पो.नि. विजय पोवार, विजय शिंदे, कॉन्स्टेबल सचिन टिळेकर आणि हवालदार मोहन शिंदे यांना कायमचे अपंगत्व आले, हे खरे आहे काय ?
(२) असल्यास, उक्त पोलीस जवानांना शौर्यपदक देण्याची मागणी गत हिवाळी अधिवेशनात राष्ट्रनिर्माण संघटनेने केली, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त जखमी पोलीसांना शौर्यपदक देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०८-२०१६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) दिनांक २६ नोव्हेंबर, २००८ रोजी झालेल्या दहशतवादी हल्यात जखमी तसेच अन्य पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांना शौर्यपदक प्रदान करण्याबाबतची शिफारस केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयास करण्यात आली होती. त्यापैकी पो.नि. विजय पोवार, विजय शिंदे, कॉन्स्टेबल सचिन टिळेकर आणि हवालदार मोहर शिंदे याच्यासह एकूण ४३ पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांना शौर्यपदक प्रदान करण्याबाबतचे प्रस्ताव अमान्य करण्यात आले आहेत.

---

### राज्यातील गुन्हे अन्वेषण विभागातील हस्तरेषा तज्ञ भरतीबाबत

**(३६) ४९१३० (१७-०५-२०१६). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील गुन्हे अन्वेषण विभागातील सुमारे ९४ हस्तरेषा तज्ञ (फिंगर प्रिंट एक्सपर्ट) यांना नुकतीच बढती दिल्यामुळे रिकाम्या झालेल्या जागा अद्यापी भरण्यात आलेल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) तसेच माहे जानेवारी, २०१६ मध्ये पुणे येथे सीआयडीज क्राईम इन महाराष्ट्र २०१४ च्या अहवालाच्या प्रसिध्दी कार्यक्रमात गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव (श्री.के.पी.बक्षी) यांनी हस्तरेषा तज्ञ व हस्ताक्षर तज्ञ यांच्या भरतीबाबतच्या नियमात दुरुस्ती करण्याची विनंती मा. मुख्यमंत्री यांना केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१६)** :(१) व (२) हे खरे आहे.
(३) सदर प्रस्तावावर शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बुलडाणा शहरात चो-यांचे वाढलेले प्रमाण**

**(३७) ४९२१८ (२०-०५-२०१६). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलडाणा शहरात माहे मार्च, २०१५ ते डिसेंबर, २०१५ या कालावधीत वा त्या सुमारास चो-यांच्या प्रकरणात मोठया प्रमाणात वाढ झाली असून त्या रोखण्यास पोलीसांना अपयश येत असल्याने स्थानिक नागरीकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वाढत असलेल्या चो-यांचे प्रमाण रोखण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१६)** :(१) बुलडाणा शहरात माहे मार्च ते डिसेंबर २०१४ या कालावधीत चोऱ्यांच्या ८० गुन्हयांची नोंद झालेली आहे तर मार्च ते डिसेंबर २०१५ या कालावधीत ९७ गुन्हयांची नोंद झालेली आहे सदर बाब लक्षात घेता बुलडाणा शहरात चोऱ्यांच्या प्रमाणात अल्पशी वाढ झाल्याचे दिसून येते.
(२) मालमत्तेच्या गुन्हयामध्ये होणारी वढ नियंत्रात आणण्याकरिता तसेच मालमत्तेच्या गुन्हयांना आळा घालण्याचे दृष्टीने पोलीस स्टेशन हद्दीत मालमत्तेचे गुन्हे घडू नये याकरीता शहरामध्ये प्रभावी नाईट गस्त करीता सात विभाग तयार करुन प्रत्येक सेक्टरमध्ये दोन कर्मचारी असे १४ कर्मचारी दररोज नियुक्त करण्यात येऊन त्यांचेकडून रात्री २३.०० ते सकाळी ०५.०० वा. पावेतो प्रत्येक भागामध्ये नाईट गस्त करण्यात येत आहे. प्रत्येक विभागामध्ये महत्वाचे ठिकाणी गस्त पुस्तिका ठेवून नाईट गस्तचे कर्मचारी यांना ठेवण्यात आलेल्या गस्त पुस्तीकामध्ये स्वाक्षरी करणेबाबत सुचित करण्यात आलेले आहे.

पोलीस स्टेशन रेकॉर्डवरुन क्रियाशील गुन्हेगार यांना नियमित चेक करुन त्यांचे हालचालीवर लक्ष ठेवून प्रभावी प्रतिबंधक कार्यवाही करण्यात येते. अचानक विशेष नाकाबंदीचे आयोजन करुन वाहन चेकींग व गुन्हेगार चेकींग करुन मालमत्तेचे गुन्हे घडणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### परभणी जिल्ह्यातील बनावट दारू विक्रीवर आळा घालण्याबाबत

**(३८) ४९२७४ (२०-०५-२०१६). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पथारी (जि.परभणी) तालुक्यातील बनावट दारूचे कारखाने व दारूचे अड्डयांवर माहे ऑक्टोबर, २०१५ च्या दरम्यान जालना पोलिसांनी धाड टाकून उद्‌वस्त केले, हे खरे आहे काय
(२) असल्यास, परभणी जिल्ह्यातील बनावट दारू विक्रीवर आळा घालण्यासाठी उत्पादन शुल्क व स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांनी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) परभणी जिल्ह्यात चोरुन लपुन हातभट्टी चालणाऱ्या अवैध दारुच्या धंद्यास आळा घालण्यासाठी परभणी पोलीस व राज्य उत्पादन शुल्क अशी संयुक्त विशेष मोहिम राबवुन सन २०१५ मध्ये गावठी दारुच्या (५६) केसेस केल्या असुन त्यात रु. २,०९,७८४/- इतक्या रकमेचा माल जप्त करण्यात आला असुन ५७ आरोपीना अटक करण्यात आलेली आहे. तसेच जानेवारी २०१६ ते २० जुन २०१६ या कालावधीत (२२) केसेस केल्या असुन त्यात रु. १,८६,६५४/- इतक्या रकमेचा माल जप्त करण्यात आला असुन २८ आरोपीना अटक करण्यात आलेली आहे. बनावट दारु विक्री बाबत माहिती काढुन केसेस करण्याचे आदेश वेळोवेळी गुन्हे बैठकी दरम्यान देण्यात आलेले आहेत
(३) विलंब झालेला नाही.

---

### चंद्रपूर जिल्ह्यात दारुबंदी असूनही तेलंगणा राज्यातून दारुची अवैधरित्या वाहतूक होत असल्याबाबत

**(३९) ५०१७० (१६-०५-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यात दारुबंदी असूनही जिवती तालुक्याला लागून असलेल्या तेलंगणा राज्यातून दारुची अवैधरित्या वाहतूक होत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०८-२०१६)** :(१) होय, हे खरे आहे.
(२) पोलीस स्टेशनद्वारे तसेच इतर माध्यमातून दिनांक १/४/२०१५ ते ३१/५/२०१६ पावेतो दारुबंदीच्या अनुषंगाने जिवती तालुक्यातील ४ पोलीस स्टेशन व ३ उप पोलीस स्टेशनमध्ये एकूण ८९२ गुन्हे दाखल करण्यात आले असून सदर ८९२ गुन्हयामध्ये एकूण १२७८ आरोपींना अटक करण्यात आली आहे व एकूण ३,६९,८६,४१३/- रुपयांचा माल हस्तगत करण्यात आला आहे. तसेच मुंबई दारुबंदी कायम कलम ९३ अन्वये ५० प्रकरणात कारवाई करण्यात आली आहे.

तेलंगणा राज्याला लागून जिवती तालुक्यातील गडचांदूर, कोरपना, जिवती, टेकामांडवा असे ४ पोलीस स्टेशन व पाटण, पिट्टीगुडा, भारी असे ३ उप पोलीस स्टेशन व पाटण, पिट्टीगुडा, भारी असे ३ उप पोलीस स्टेशन आहेत. जिवती तालुक्यात तसेच त्या मार्गाने चंद्रपुर जिल्हयात बाहेर जिल्हयातून/सिमावर्ती भागातून दारुचा पुरवठा होऊ शकतो म्हणून त्यास आळा घालण्यासाठी तसेच प्रतिबंध व कार्यवाही करण्यासाठी पोलीस स्टेशनमधून अचानक नाकाबंदी लावू आलटून पालटून चेकींग पॉईंट लावण्यात येत आहे. अवैध दारु वाहतुक व विक्रीकर आळा घालण्यासाठी प्रत्येक पोलीस स्टेशन पातळीवर तसेच जिल्हयाचे ठिकाणी स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपुर येथे भरारी पथकाची नियुक्ती करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर येथील वीज केंद्रात कोळशाची चोरी होत असल्याबाबत

**(४०) ५०१८९ (१६-०५-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर येथील वीज केंद्रात कोळसा न आणता केवळ बनावट स्वाक्षरी व शिक्क्याची पावती पाठवून कोळशाची चोरी होत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक पोलिसांत तक्रार करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर तक्रारीनुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०८-२०१६)** :(१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी तक्रारदार व कार्यकारी अभियंता सि.एस.टी.पी.एस चंद्रपूर यांचे तक्रारीवरुन पोलीस स्टेशन, दुर्गापूर येथे अप क्र.२३/२०१६ कलम ४२०,४६८,४७१,३४ भादंवि अन्वये दिनांक २४.०१.२०१६ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे सदर गुन्ह्यात एकुण ९ आरोपींना अटक करण्यात आली आहे सदर गुन्ह्याचे तपासात सि.एस.टी.पी एस. या कंपनीचा २० ट्रक कोळसा एकुण २९७.०५ टन कोळसा खुल्या बाजारात आरोपींनी विक्री करुन फसवणुक केल्याचे निष्पन्न झाले आहे. गुन्ह्यातील अटक केलेल्या आरोपीविरुध्द साक्षीदाराचे बयान नोंदवून पुरावा गोळा करणे बाकी असुन सदर गुन्हा  पोलीस तपासावर प्रलंबित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भायखळा (मुंबई) येथील मराठा रुग्णालय कंपाऊंड या महानगरपालिका वसाहतीत मोठया प्रमाणात अनाधिकृत बांधकाम करण्यात आल्याबाबत**

**(४१) ५०२२४ (०३-०५-२०१६). श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भायखळा (मुंबई) येथील मराठा रुग्णालय कंपाऊंड या महानगरपालिका वसाहतीत मोठया प्रमाणात अनाधिकृत बांधकाम करण्यात आल्याबाबतची गंभीर बाब माहे फेब्रुवारी, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे आणि सदर अनाधिकृत बांधकाम निष्काषित करण्याबाबत शासनाकडून आजातागायत कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-१०-२०१६) :**(१), (२), (३) व (४) महानगरपालिकेमार्फत भायखळा येथील मराठा रुग्णालय कंपाऊंड या वसाहतीची पाहणी केली असता, तेथे कोणत्याही प्रकारचे अनधिकृत बांधकाम आढळून आले नाही.

तथापि, सदर ठिकाणी १३ झोपड्या असून त्यातील ३ झोपडीधारकांना झोपडीपट्टी सुधारणा विभागामार्फत झोपडी ओळखपत्र देण्यात आले आहे. ९ झोपडीधारकांकडून त्यांच्या झोपडीच्या दिनांक ०१.०१.२००० पूर्वीच्या पुराव्यांची मागणी करण्यात आली आहे. सदर झोपड्यांची शासन निर्णयानुसार पात्रता निश्चित करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच, एका झोपडीधारकाचे नगर दिवाणी न्यायरलयामध्ये सुट क्रमांक २४६०/२००८ अन्वये प्रकरण प्रलंबित आहे.

सदर झोपड्यांची पात्रता निश्चित झाल्यावर अपात्र झोपडीधारकांवर महानगरपालिकेमार्फत निष्कासनाची कारवाई करण्यात येणार आहे.

---

## नंदूरबार येथे कंझारभाट समाजातील एका महिलेस अग्नीपरिक्षा देण्यासाठी प्रवृत्त करण्यात आल्याबाबत

**(४२) ५०२९७ (१६-०५-२०१६). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदूरबार येथे कंझारभाट समाजातील एका महिलेस पतीच्या मृत्यूनंतर चारित्र्यावर संशय घेवून अग्नीपरिक्षा देण्यासाठी सासर कडील मंडळीनी प्रवृत्त केल्याचा अघोरी प्रकार नुकताच निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकारास कंटाळून सदर महिला ओझर नाशिक येथे माहेरी राहवायास आली असता तेथेही जातपंचायतीने त्रास दिल्याने नाशिक ग्रामीण पोलिसांकडे सदर महिलेने तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी जातपंयायत व सासरच्या लोकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०८-२०१६) :**(१) नाही.

अर्जदार महिलेच्या तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने झालेल्या चौकशीत जातपंचायतीकडून कोणताही छळ झालेला नसून तो विधी होईल अशी भिती अर्जदार यांना होती असे निष्पन्न झाले आहे.

(२) होय,

अर्जदार हिने माहेरी ओझर जि. नाशिक येथे जाऊन दिनांक ०५/०२/२०१६ रोजी तक्रार दाखल केली.

(३) अर्जदाराने दिलेल्या फिर्यादी वरुन दिनांक ०६/०२/२०१६ नंदूरबार शहर पोलीस ठाण्यास वर्ग ५ गुरनं २०/२०१६ भादवि क ३५४ अ ब, ३८४, १२० ब ५०४, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हा दाखल झालेनंतर या प्रकरणातील जातपंचायत व सासरच्या लोकांना मा. सत्र न्यायालय नंदुरबार यांचे कोर्टाकडून अंतरीम जामीन मंजूर झाला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पिंपळदरी (ता.गंगाखेड, जि.परभणी) येथे पोलीस स्टेशनची इमारत बांधण्याबाबत

**(४३) ५०८०५ (१६-०५-२०१६). श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळदरी (ता.गंगाखेड,जि.परभणी) येथे १९९८ मध्ये स्टेशन सुरु करण्यात आले असून या पोलीस स्टेशनचे कामकाज मागील १८ वर्षापासून गोडावून मध्ये सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पोलीस स्टेशनच्या इमारतीसाठी व कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांसाठी शासनाने पाच एकर जागा दिली असून जागा उपलब्ध असूनही अद्यापर्यंत पोलीस स्टेशनची इमारत न बांधण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, इमारतीच्या बांधकामाचा प्रस्ताव सादर करण्याचे आदेश मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक २३ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर पोलिस स्टेशनची इमारत बांधण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०१६) :**(१) सदरील पोलीस स्टेशन सन २००१ पासून कार्यान्वित झालेले असून पोलीस स्टेशन पिंपळदरी हे विविध सेवा सहकारी सोसायटी पिंपळदरी यांचे कार्यालयात कार्यान्वितआहे.

(२), (३) व (४) पोलीस स्टेशन, पिंपळदरी, परभणी येथे नवीन इमारत आणि पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांकरीता निवासस्थान बांधण्याच्या प्रस्तावावर उपलब्ध निधी विचारात घेऊन प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**म्हाळुंगे (जि. पुणे) एमआयडीसी येथे नविन पोलीस ठाणे निर्माण करणेबाबत**

**(४४) ५०८१८ (२०-०५-२०१६). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाळुंगे (जि. पुणे) एमआयडीसीमध्ये असलेल्या बहुराष्ट्रीय कंपन्या, तेथील कामगार समस्या, निरनिराळ्या भागातून आलेले अनेक लोकांचे वाढते वास्तव्य यामुळे भांडण, चोऱ्या, दरोडे यासारख्या गुन्हांचे प्रमाणात वाढ झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलिस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांनी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचेकडे माहे एप्रिल, २०१२ वा त्यासुमारास म्हाळुंगे एमआयडीसी येथे नविन पोलीस ठाणे निर्माण करणेबाबत प्रस्ताव पाठविला असून स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २ फेब्रुवारी, २०१६ रोजी मुख्यमंत्री यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच मऔविमने त्यांचेकडील पत्र क्र. आरओपी/एमआयडीसी/एल/३०६ दिनांक:- ११ जानेवारी, २०१२ अन्वये म्हाळुंगे येथील पोलीस चौकीसाठी १०० चौमी जागा दिनांक २७ मार्च २०१२ रोजी पोलीस खात्याच्या ताब्यात दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त नविन पोलीस ठाणे निर्माण करणेबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१६)** :(१) चाकण पोलीस ठाणे येथे सन २०१४ ते २०१६ मध्ये दाखल झालेल्या भांडण, चोऱ्या व दरोडेखोरीची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | गुन्हाचा प्रकार | सन २०१४ | सन २०१५ | सन २०१६ (मे पर्यत) |
|---|---|---|---|---|
| १ | भांडण | २० | २४ | ९ |
| २ | चोरी | ५३ | ७३ | ३३ |
| ३ | दरोडा | ५ | ३ | ०० |

वरील आकडेवारीच्या अनुषंगाने गुन्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येत नाही.

(२) व (३) होय, हे खरे आहे.

प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, पुणे यांनी चाकण औद्योगिक क्षेत्र टप्पा क्रमांक २ मधील सुविधा भुखंड क्रमांक १ शेजारी २००० चौ.मी. क्षेत्राचा भूखंड म्हाळुंगे पोलीस स्टेशन करिता राखीब ठेवण्यात आला असून सदरचा भुखंड म्हाळुंगे पोलीस स्टेशनकरीता पोलीस खात्याचे नावे वर्ग करण्याबाबत प्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनी पोलीस अधिक्षक पुणे ग्रामीण यांना कळविले आहे.

(४) महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील नवनिर्मित ६१४९४ पदनिर्मितीच्या एकत्रित पाच टप्पयांतील दुसऱ्या टप्पयामध्ये पोलीस अधिक्षक पुणे ग्रामीण यांचे आस्थापनेवरील चाकण पोलीस ठाणेचे विभाजन करुन नवीन म्हाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाणे निर्माण करणेबाबत व त्याकरिता विविध शाखा व विविध संवर्गाकरिता पोलीस अधिकारी / कर्मचारी यांची एकूण ६२ पदे मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राधानगरी (जि. कोल्हापूर) तालुक्यात पोलीस दूरक्षेत्र उभारण्याबाबत**

**(४५) ५१३९५ (१६-०५-२०१६). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राधानगरी (जि. कोल्हापूर) तालुक्यात पश्चिम भागात गुन्हेगारीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने तुळशी, म्हासुर्ली या संवेदनशील भागात पोलीस दूरक्षेत्राची निर्मिती करण्यात यावी अशी मागणी परिसरातील जनतेने वारंवार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परिसरातील धामोड किंवा म्हासुर्ली येथे पोलीस दूरक्षेत्र उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त पोलीस दूरक्षेत्र उभारण्याबाबत शासनने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१६) :**(१) राधानगरी तालुक्यातील पश्चिम भागात गुन्हेगारीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली नसून पोलीस ठाण्याहून धामोड, म्हासुर्ली हा भाग दुरु असल्याने व पोलीस ठाण्यात येणे जनतेला त्रासाचे होत असल्याने पोलीस दुरक्षेत्राची निर्मिती करण्यात यावी, अशी परिसरातील जनतेने मागणी केलेली आहे.
(२) व (३) सद्य:स्थितीत पोलीस ठाण्याकडे दाखल गुन्ह्यांची संख्या पहाता धामोड व म्हासुर्ली येथे दुरक्षेत्र उभारण्याची आवश्यकता वाटत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उमरखेड (जि.यवतमाळ) येथील पोलीस ठाण्याअंतर्गत सुरु असलेल्या अवैध धंद्याबाबत

**(४६) ५१८३८ (१७-०५-२०१६). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमरखेड (जि.यवतमाळ) येथील पोलीस ठाण्याअंतर्गत सुरु असलेल्या अवैध धंद्या विरोधात उमरखेड पोलीसांनी कुठलीही कारवाई न केल्यामुळे अखेर यवतमाळ जिल्हा पोलीस अधिक्षक श्री. अखिलेश सिंग यांनी मिळालेल्या गोपणीय माहिती वरुन विशेष पथक पाठवुन शहरात सुरु असलेल्या दोन ठिकाणच्या मटका अड्यावर दिनांक १४ फेब्रुवारी, २०१६ रोजी धाड टाकून ६९,५०० रुपयाच्या मुद्दे मालासह बारा जणांना अटक करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणाबाबत कोणतीही कारवाई न करणाऱ्या उमरखेड पोलीस निरिक्षक व पोलीस कर्मचा-यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) उमरेड शहरात सुरु असलेल्या अवैध धंद्याबाबत ठोस कारवाई संबंधित पोलीस स्टेशनकडून होत नसल्याचे दिसून आल्याने सदर प्रकरणी संबंधित पोलीस निरीक्षकाकडून स्पष्टीकरण मागविण्यात आले आहे. तसेच बिट अंमलदार, पोलीस हवालदारास रुपये ५०००/- आर्थिक दंडाची शिक्षा देणेबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगाव जिल्हयातील चाळीसगाव शहरासाठी वाहतुक शाखा स्थापण्याबाबत**

**(४७) ५१८७१ (२८-०४-२०१६). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्हयातील चाळीसगाव शहरासाठी वाहतुक शाखा स्थापण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती जळगाव जिल्हयातील चाळीसगाव शहरासाठी वाहतुक शाखा स्थापण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१६) :**(१), (२) व (३) चाळीसगांव शहरातील रहदारी नियमन चांगल्या प्रकारे हाताळता यावेत यासाठी गृह विभाग शासन निर्णय दि. २७.१.२०१६ अन्वये जळगांव शहर वाहतुक शाखेसाठी निर्माण करण्यात आलेली पोलीस अधिकारी/कर्मचारी यांची ४९ पदे ही चाळीसगांव शहर वाहतुक शाखेकरीता वर्ग करण्यात मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार चाळीसगांव शहर वाहतुक शाखा दि १४.६.२०१६ पासुन कार्यान्वित झालेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक पोलीस मुख्यालयाच्या आवारातून बॅरीकेट्सची चाके चोरण्यात आल्याबाबत**

**(४८) ५३०९८ (२०-०५-२०१६). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक पोलीस मुख्यालयाच्या आवारातून सिंहस्थ कुंभमेळयाच्या काळात खरेदी केलेल्या हजारो बॅरीकेट्सची चाके चोरण्यात आल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(३) नसल्यास, विलंबाची करणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३१-०८-२०१६) :**(१) व (२) सिंहस्थ कुंभमेळ्यात बंदोबस्तासाठी ४००० मोझो बॅरीकेट्स व २००० स्टिल बॅरीकेट्स व्हील असलेले खरेदी करण्यात आले होते. सदर बंदोबस्ताचे वेळी शळरात येणाऱ्या मार्गावर वाहतूक नियमन आणि भाविकांच्या मार्गाचे नियमनासाठी वापर करण्यात येत असल्यामुळे सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत वाटप करण्यात आले होते. त्यापैकी पोलीस कवायत मैदारावर ठेवण्यात आलेल्या काही बॅरीकेट्सची चाके चोरली गेल्याची घटना निदर्शनास आल्यानंतर तेथे पिकेट ड्युटीची जबाबदारी देण्यात आलेल्या सहायक पोलीस उप निरीक्षक यांना जबाबदार धरुन सक्त ताकीद ही शिक्षा देण्यात आली आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

**पनवेल-उरण तालुक्यातील सिडकोने संपादित केलेल्या जमिनीवर रिलायन्स सेझनं कोणत्याही प्रकारचा प्रकल्प उभारला नसल्याबाबत**

**(४९) ५३२४६ (१९-०५-२०१६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल-उरण तालुक्यातील सिडकोने शेतकऱ्यांच्या जमिनी सेझ ला विविध प्रकल्प उभारण्यासाठी संपादित केल्याचे माहे जानेवारी २०१६ वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पासाठी सिडकोने रिलायन्स सेझसाठी संपादित केलेल्या जमिनीत अद्यापही कोणत्याही प्रकारचा प्रकल्प उभारला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग क्र.२ बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०९-२०१६) :**(१) होय, नवी मुंबई प्रकल्पासाठी संपादित सिडकोकडे हस्तांतरित केलेल्या जमिनीपैकी २१४० हे जमीनीवर विशेष आर्थिक क्षेत्र विकसीत करण्यासाठी सदर जमीन मे. नवी मुंबई एस.ई.झेड प्रा.लि. या कंपनीस देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यापैकी १८४२ हे जमीन सन २००६ ते २००८ या दरम्यान नवी मुंबई विशेष आर्थिक क्षेत्र विकसित करण्यासाठी ६० वर्षाच्या भाडे-पट्टयावर कंपनीस देण्यात आली आहे.

(२) व (३) मे. नवी मुंबई एस.ई.झेड. प्रा.लि. कंपनीने आतापर्यंत सुमार ८०% संरक्षक भिंत, बाह्य पाणी पुरवठा वाहिनी, २ माहिती तंत्रज्ञान इमारतींचे बांधकाम तसेच इतर पायाभूत बांधकामे पूर्ण केली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आळंदी नगरपरिषदेत (जि.पुणे) दुषित पाण्याचा पिण्याचे पाणी म्हणून पुरवठा होत असल्याबाबत**

**(५०) ५३६३६ (२९-०८-२०१६). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आळंदी नगरपरिषदेने (जि.पुणे) इंद्रायणी नदीतील सिद्धबेट बंधाऱ्यातून रसायन आणि सांडपाणी मिश्रित पाण्याचा माहे मार्च २०१६ वा त्यादरम्यान पिण्याचे पाणी म्हणून नागरिकांना पुरवठा केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुषित पाण्यामुळे आळंदी परिसरात कावीळ, हगवण अशा भयानक रोगांची साथ निर्माण झाल्याने शुद्ध पाणी पुरवठा करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी यांना माहे फेब्रुवारी, २०१६ वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शुद्ध पाणी पुरवठा करणेकरिता नगरपरिषदेने काय उपाय योजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-११-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) असे निदर्शनास आले नाही.
(३) आळंदी नगरपरिषदेने नगर परिषद हद्दीतील विविध २० ठिकाणचे पाण्याचे नमूने प्रयोगशाळेतून मार्च, २०१६ मध्ये तपासून घेतले असून सर्व नमुने पिण्यास योग्य असल्याबाबत राज्य आरोग्य प्रयोगशाळा यांचा अहवाल प्राप्त झाला आहे. शुध्द पाणी पुरवठा करण्याकरिता आळंदी नगरपरिषदेने विहित प्रक्रिया करुन जलशुध्दीकरण केंद्र हे खाजगी तत्वावर चालविण्याकरीता दिले आहे. सदर जलशुध्दीकरण केंद्रातून क्रमवार निर्जंतुकीकरण प्रक्रिया करुन पाणी शुध्द केले जाते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.